फॉर्म किमंत रु.100/- ना परतावा


# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
## कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर.

५३९, राजेंद्रनगर, कोल्हापूर-४१६ ००४.

दुरध्वनी क्र-०२३१-२६९६१०१/२/३ Website-www.sscboardkolhapur.in Email Id- divsec.kop@gmail.com


क्र.कोविमं/भांडार/ 335

दिनांक:- 29 APR 2024

**निविदा क्र. K-04 / भांडार / कार्यालयीन उपहारगृह चालविणेसाठी / 2024-2025**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर या कार्यालयातील उपहारगृह चालविणेसाठी खालील अटी व शर्तीस अधिन राहून सोबत जोडलेल्या तपशिलानुसार सीलबंद दरपत्रके दिनांक 29/04/2024 ते दिनांक 08/05/2025 या कालावधीसाठी मागविण्यात येत आहेत. दिनांक 08/05/2025 रोजी साय. 5.00 वा नंतर प्राप्त होणारी दरपत्रके कोणत्याही परिस्थितीत स्विकारली जाणार नाहीत, याची नोंद घ्यावी.

दरपत्रकासाठी 'अ ' व ' ब ' लिफाफा पध्दत आहे.

**'अ ' लिफाफ्यात सादर करावयाची कागदपत्रे**

1. मुंबई दुकाने व संस्था अधिनियम 1948 अन्वये अद्ययावत व्यवसाय नोंदणी परवान्याची स्कॅन प्रत.
2. पॅनकार्ड छायाप्रत.
3. आधार कार्डाची छायाप्रत.
4. बचत गटामार्फत उपहारगृह चालवावयाचे असल्यास बचत गटाचे अद्ययावत नोंदणी प्रमाणपत्राची साक्षांकित छायाप्रत.
5. बचत गटाच्या स्थापना उद्दिष्टात उपहारगृह किंवा तत्सम व्यवसाय करणे हे उद्दिष्ट असल्याबाबतचा कागदोपत्री पुरावा.
6. उपहारगृह चालविण्याचा पुर्वानुभव असल्यास सदर संस्थांच्या अनुभव प्रमाणपत्रांची साक्षांकित छायाप्रत.

**'ब ' लिफाफ्यात सादर करावयाची कागदपत्रे**

**मंडळाने दिलेल्या विहीत नमुन्यांतील पदार्थांचे दरपत्रक मुळ प्रत.**

1. अंतिम मान्य टेकेदारास सुरक्षा ठेव रक्कम रू.5000/- (रू.पाच हजार फक्त) रोखीने कार्यालयात जमा करावी लागेल. सुरक्षा ठेव रक्कमेपासून कोणालाही सूट मिळणार नाही. दरपत्रक व करारनाम्यातील अटींचा भंग केल्यास सुरक्षा रक्कम जप्त करण्याचा अधिकार मंडळाकडे राहील.
2. कोणतेही दरपत्रक स्विकारणे अगर कोणतेही कारण न देता नाकारणे याचा अधिकार मंडळाने राखून ठेवला आहे.
3. मान्य ठेकेदारास रू.100/- च्या स्टॅम्प पेपरवर करारनामा करून द्यावा लागेल.
4. मान्य ठेकेदारास हे उपहारगृह त्याच्या व्यतिरिक्त दुसऱ्यास चालविण्यास देता येणार नाही.
5. ठेकेदाराने उपहारगृह समाधानकारक चालविले नाही तर एक महिन्याची नोटीस देऊन ठेकेदारांकडून उपहारगृह काढून घेतले जाईल. याबाबतचे अंतिम अधिकार मंडळाचे राहतील.
6. उपहारगृहासाठी दरमहा किमान रू.1200/- भाडे ठरवण्यात आले आहे. वीज मीटर भाडे स्वतंत्र आकारण्यात येईल. यापेक्षा जादा भाडे देणाऱ्याचा प्राधान्याने विचार करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.
7. कार्यालयाकडे सद्या असलेले आवश्यक फर्निचर मोफत वापरावयास मिळेल. त्यामध्ये कार्यालयाची पूर्वपरवानगी घेतल्याशिवाय बदल करता येणार नाही. उपहारगृह पुरवठा करावयाच्या वस्तूंच्या दराचा मोठा फलक तयार करून उपहारगृहाच्या दर्शनी भागात करारपत्र केल्याबरोबर तात्काळ लावणे बंधनकारक राहील.

8. कार्यालयाने दिलेल्या वस्तुपैकी कांही वस्तु हरविल्यास अगर मोडतोड झाल्यास त्याची पूर्ण भरपाई करून
देण्याची जबाबदार ठेकेदारांवर राहील. उपहारगृह नेहमी स्वच्छ राहील याची दक्षता ठेकेदाराने घेणे बंधनकारक
राहील.
9. ठेकेदारास विद्युत वापराचे वीज देयक प्रतिमहा भरावयाचे आहे. पाणी मोफत वापरावयास मिळेल.
तंबाखू, गुटखा, मद्य, सिगारेट इत्यादी नशिले पदार्थ / वस्तु उपहारगृहात ठेवण्यास सक्त मनाई आहे. तसे
10. आढळल्यास सुरक्षा ठेव रक्कम जप्त करण्यात येऊन अधिकची योग्य ती दंडात्मक कारवाई करण्याचे
अधिकार मंडळास राहतील.
खाद्य पदार्थांचे अंतिम मान्यता दिलेले सुरूवातीचे दर करार कालावधीच्या पूर्ण वर्षांसाठी बंधनकारक राहतील
11. त्या दरांमध्ये करार कालावधी दरम्यान कोणतीही दर वाढ करता येणार नाही. उपहारगृहाची वेळ सकाळी
9.45 ते सायंकाळी 6.15 अशी राहील. त्यामध्ये सुरूवातीस 1 तास व नंतर 1 तास उपहारगृह सुरू राहील.
त्यानंतर कोणत्याही परिस्थितीत मंडळाच्या पूर्व परवानगी शिवाय उपहारगृह सुरू ठेवता येणार नाही जर तसे
आढळल्यास मंडळामार्फत ठेकेदारावर तात्काळ कार्यवाही करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.
12. ठेका कालावधीत मंडळाचे तपासणी पथक केव्हाही तपासणीसाठी उपहारगृहात येईल व त्यावेळी काही
आक्षेपार्ह आढळल्यास कामाचा ठेका तात्काळ रद्द करण्याचे अधिकार मंडळास राहील.
13. जर कामाचा ठेका मिळाल्यास मंडळासोबत करण्यात येणाऱ्या करारपत्राचा वापर अन्य कोणत्याही कामासाठी
उपयोगात आणला जाणार नाही याचे लेखी हमीपत्र कार्यालयास द्यावे लागेल. तसेच सदरबाबत काही
आक्षेपार्ह व्यवहार केल्याचे आढळल्यास तात्काळ मंडळामार्फत कायदेशीर कारवाई करण्यात येईल.
14. उपहारगृह चालू असल्याच्या कालावधीत जर काही अडचण व तंटा उद्‌भवल्यास स्वत:च्या अधिकारात
कोणताही निर्णय न घेता प्रथम सदर बाबी या कार्यालयाच्या निदर्शनास आणणे अनिवार्य आहे, तसे न करता
जर काही घटना घडली तर मंडळामार्फत तात्काळ ठेकेदारावर कायदेशीर कारवाई करण्यात येईल.
15. दरपत्रकातील जेवणाचे दर हे दुपारच्या जेवणाचे असून ते केवळ मंडळात येणाऱ्या अभ्यागतांसाठी आहेत.
जेवण पुरवण्याची ऑर्डर देण्याची कोणतीही जबाबदारी मंडळावर राहणार नाही.
16. साप्ताहिक सुट्टी व सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी उपहारगृह बंद राहील, तथापि मंडळास आवश्यकता भासल्यास
सुट्टीच्या दिवशी उपहारगृह सुरू ठेवण्याबाबत निर्देश देऊ शकेल.
17. उपहारगृहाद्वारे पुरवठा होणाऱ्या पदार्थांमध्ये कोणत्याही प्रकारची भेसळ वा एखाद्या ग्राहकाला खाद्य पदार्थ
खाल्ल्यामुळे काही त्रास झाल्यास त्याबाबतची सर्व जबाबदारी उपहारगृह धारकाची राहील.
18. उपहारगृहासाठी दिलेल्या जागेचाच वापर उपहारगृह धारकाने करावयाचा आहे.
दरपत्रकाचे सिलबंद पाकिटावर ठेकेदाराचे नांव व पत्ता लिहीणे आवश्यक आहे. तसेच सदर पाकिटावर सन
2024-2025 करिता कार्यालयीन आवारातील उपहारगृह चालविणे साठीचे दरपत्रक असा स्पष्ट उल्लेख
करावा.

**(सुभाष रा. चौगुले)**
**विभागीय सचिव,**
**कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर.**

ack

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर.
५३९, राजेंद्रनगर, कोल्हापूर-४१६ ००४.
दुरध्वनी क्र-०२३१-२६९६१०१/२/३ Website-www.sscboardkolhapur.in Email Id- divsec.kop@gmail.com

## उपहारगृहातील पदार्थांचे दरपत्रक

| अ. क्र. | पदार्थांचे नांव | अपेक्षित एका प्लेटचा दर |
|---|---|---|
| 1 | साधा चहा | |
| 2 | स्पेशल चहा | |
| 3 | कॉफी | |
| 4 | दूध | |
| 5 | बटाटे वडा सांबार | |
| 6 | भजी | |
| 7 | मिसळ पाव | |
| 8 | इडली सांबार | |
| 9 | शिरा | |
| 10 | साबुदाणा खिचडी | |
| 11 | 2 चपाती भाजी प्लेट / पुरी भाजी | |
| 12 | बटाटे वडा (सुका) 1 वडा व 1 पाव | |
| 13 | उपमा / उप्पीट | |
| 14 | कांदापोहे | |
| 15 | शाकाहारी राईस प्लेट (2चपाती, 1प्लेट भात, 1वाटी भाजी, 1वाटी आमटी व लोणचे) | |
| 16 | स्पेशल शाकाहारी राईस प्लेट (2चपाती, 1प्लेट भात, 1वाटी भाजी, 1 वाटी आमटी , खरडा, लोणचे,पापड व एक वाटी स्वीट) | |
| 17 | मासांहारी (मटण) राईस प्लेट (2चपाती, 1प्लेट भात, 1वाटी सुक्के, 1 वाटी तांबडा रस्सा, 1 वाटी पांढरा रस्सा) | |
| 18 | मासांहारी (चिकन) राईस प्लेट (2चपाती, 1प्लेट भात, 1वाटी सुक्के, 1 वाटी तांबडा रस्सा, 1 वाटी पांढरा रस्सा) | |

निविदाधारकाची सही व रबरी शिक्का

स्थळ : कोल्हापूर
दिनांक:-

ack